प्रत्येक तालुक्यात कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखा अनुदान तत्वावर आणण्यासाठी कार्यबल गटाच्या स्थापनेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. अनुदा-२०११/ (२००/११) पुनर्बांधणी -६/मशि ४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०२ डिसेंबर २०१७

संदर्भ : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.एनजीसी-२००७/(१६४/०७)/मशि-३, दि.४.२.२००८.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.एनजीसी-२००८/(९७/०८)/मशि-३, दि.१४.५.२००९.
३) शासन पुरकपत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.एनजीसी-२००८/(२००/०८)/मशि-३, दि.२.७.२०१४.
४) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/(२०२/१५)/मशि-४, दि.०५.१२.२०१५.
५) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र.अशाम/२०१७/२१३९१/२६६/तालुका एकमेव/पुवि/मवि-२/११५७४, दि.२९.९.२०१७

शासन निर्णय :-

तालुक्यातील एकमेव विद्याशाखा/महाविद्यालय अनुदान तत्वावर आणण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने संदर्भीय क्र.१ येथील शासन निर्णयान्वये घेतला आहे. त्यानुषंगाने प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची गुणवत्तेवर निवड करण्यासाठी संदर्भीय क्र.२ येथील शासन निर्णयान्वये कार्यबल गटाची स्थापना करण्यात आली होती. संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये गठीत केलेल्या कार्यबल गटाची पुनर्रचना करण्यात आली होती.

आता, तालुक्यातील एकमेव योजनांतर्गत उर्वरित असणाऱ्या तालुक्यांसाठी नव्याने जाहिरात देण्याकरीता संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी संदर्भीय क्र.५ येथील पत्रान्वये कार्यबल गटाचे पुर्नगठन करण्याची विनंती केलेली आहे. त्यानुसार कार्यबल गटाचे पुनर्गठन करण्यात येत आहे.

अ.क्र.	सदस्याचे नाव	पदनाम
१.	डॉ. मुरलीधर चांदेकर, माजी प्र.कुलगुरु,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर	अध्यक्ष
२.	डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	सदस्य
३.	डॉ. आर.एस.माळी, माजी कुलगुरु, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव	सदस्य

४.	डॉ. नितीन करमाळकर, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे	सदस्य
५.	डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे	सदस्य सचिव

२. कार्यबल गटाची कार्यकक्षा व अधिकार हे संदर्भीय क्र. २ येथील शासन निर्णयाप्रमाणे असतील. त्याशिवाय कार्यबल गटाने शासनाने नवीन महाविद्यालय/विद्याशाखा/ अभ्यासक्रम/अतिरीक्त तुकड्या इ. मंजुरी देण्यासाठी शासनाने विहित केलेले निकष व अनुदानासाठी विहित केलेले निकष इत्यादींच्या आधारे तपासणी करणे आवश्यक राहील. या व्यतिरीक्त अन्य काही बाबींची तपासणी करणे आवश्यक असल्यास, त्याबाबी निश्चित करावयाचे अधिकारही कार्यबल गटास राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२०२१५५६११२८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dattatray Vasantrao kharke

Digitally signed by Dattatray Vasantrao kharke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d598800beb5ed37ae09d78fff05921827123426ec3977a7476478ce183be979d, cn=Dattatray Vasantrao kharke
Date: 2017.12.02 16:37:40 +05'30'

(द.व.खारके)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
४. मा. मंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व समिती सदस्य (संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेमार्फत)
८. निवडनस्ती (मशि-४)